I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 257-262
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/000016?
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाची भुमिका

विशाल डब्लू. मालेकार
अर्थशास्त्र विभाग, प्रभाकरराव मामुलकर महाविद्यालय, कोरपना
*Corresponding Author :- malekarvishal71@gmail.com

Communicated : 20.12.2022 Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 Published: 30.01.2023

**सारांश :**
राष्ट्रिय नमुना सर्व्हेक्षण २०१५–१६ (एनएसएस) च्या ७३ व्या फेरीनुसार देशातील एकूण उद्योगापैकी ९० टक्के उद्योग(६.३ कोटी उद्योग) सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे असून या उद्योगांच्या उत्पादनात ६५०० प्रकारच्या विविध उत्पादनाचा समावेश आहे. देशाच्या एकूण रोजगारात ४५ टक्के रोजगार म्हणजे जवळपास १२ कोटी रोजगार आणि देशाच्या एकूण निर्यातीत ४८ टक्के वाटा सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा आहे.२०१६–१७ मध्ये देशाच्या नाममात्र सकल देशांतर्गत उत्पादनातील(जीडीपी) वाटा ३० टक्के तर, सकल मुल्य उत्पादनातील(जीव्हीओ) वाटा ४५ टक्के आहे. भविष्यात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचा सकल देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५० टक्के पर्यंत घेउन जाण्याचे व देशाला आत्मनिर्भर बनविण्याची क्षमता व शक्ती एमएसएमई मध्ये असल्याचे वरील आकडेवारीवरून सहज निर्देशीत होते.
आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेवर आधारीत सबका साथ, सबका विकास आणि आता त्यात सबका प्रयास जोडल्या गेलेला आहे. त्यामुळे स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडियाला साकार करण्याच्या दृष्टिने सरकारने सर्वसमावेशी विकासावर आधारीतएमएसएमईला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आखलेल्या आत्मनिर्भर भारताच्या महत्वकांक्षी धोरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचे निर्धारीत ५ ट्रिलीयन डॉलरचे उद्दिष्ट सहज गाठता येण्याच्या आशा यामुळे नक्कीच पल्लवित झालेल्या आहे. असेच म्हणावे लागेल.

**प्रस्तावना :**

१८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली हे परीवर्तन भारताच्या हस्त लघु आणि कुटिर उद्योगावर दूरगामी परीणाम करणारे होते. औद्योगिकक्रांती पूर्वी हस्त उद्योगाच्या काळात भारत आंतरराष्ट्रिय व्यापारात क्रमांक एकचा देश होता. या परीवर्तनाचा परीणाम भारतातील हस्त उद्योगांच्या ऱ्हासाला सुरवात झाली आणि भारताची आंतरराष्ट्रिय व्यापारात पिछेहाट झाली.

भारतीय अर्थव्यवस्थेची एक विशिष्ट अशी संरचना होती. ज्यामध्ये अर्थव्यवस्थेचा मुलाधार कृषी होता. देशाचे उत्पन्न, उत्पादन व रोजगार आणि व्यापारसुध्दा कृषी क्षेत्रावरच निर्भर होता. या रचनेत ज्यांच्या मालकीची शेती होती ते शेती करायचे. ज्याच्याकडे शेतजमीन नव्हती परंतु कृषी उत्पादन कौशल्ये होती ते त्या कृषीवर मजुर म्हणून काम करायचे, व ज्यांच्याकडे कृषी कौशल्य नाही असे लोक त्यांच्याकडे चपला–जोडे, नांगर,वखर,कुदळ, पावडे इ. अशाप्रकारची विविध शेती उपयोगी लाकडी तसेच लोखंडी अवजारे, दोर,घरगुती उपयोगाच्या भांडी, कपडे, शोभीवंत, कलाकुसरीच्या वस्तु बनविण्याची कला होती असे कारागीर या वस्तुंचे हस्त उत्पादन करून गावातील लोकांच्या गरजा भागवून त्यावर आपली उपजिविका करीत असे. त्यामुळे प्रत्येक घटक कामी होता व प्रत्येकाच्या हाताला काम होते. थोडक्यात भारतात पूर्णरोजगार दिसून येत होता. स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर अशी औद्योगिकक्रांती पूर्वीची एकंदर भारतीय अर्थव्यवस्थेची रचना व स्वरूप होते.

आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला ७५ वर्षाचा गौरवशाली इतिहास लाभलेला आहे. या ७५ वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता अनेक आव्हानात्मक व प्रयोगशील निर्णय घेण्यात आले त्याचाच परीणाम आजच्या अर्थव्यवस्थेची दिसून येणारी प्रगती आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासप्रक्रियेला सुरूवात

प्रामुख्याने पंचवार्षिक योजनेपासून झाली. त्यानंतर हरीत क्रांती, औद्योगिक धोरण, अशा अनेक धोरणात्मक निर्णयानंतर मिश्र अर्थव्यवस्थेचे स्वरूप असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या वेगवान विकासाला खऱ्या अर्थाने प्रत्यक्षपणे सुरूवात झाली ती म्हणजे इ.स. १९९१ नंतरच्या स्विकारलेल्या नविण आर्थिक धोरण नितीनंतरच. त्यानंतर अनेक सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने निर्गुंतवणूकिचे धोरणे, थेट विदेशी गुंतवणूक निती, सेझ सारखे प्रकल्प राबविण्यात आले. परंतु अशा अनेक धोरणात्मक नितीचा अवलंब करून देखील सकल देशांतर्गत उत्पादनात स्थिरता दिसून आली नाही.

८ नोव्हेंबर २०१६ नोटबंदिचा निर्णय, कर सुधारणा धोरणाचा एक राष्ट्र एक कर जीएसटी चा घेण्यात आलेला निर्णय, आणि लगेच आलेल कोविड–१९ महामारीच संकट त्यामुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्थाच ठप्प झाली. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम बंद पडले. त्याचा फार मोठा परीणाम देशाच्या उत्पन्न उत्पादन, रोजगार व निर्यातीवर झाला. २७० अब्ज डॉलरची भारतीय अर्थव्यवस्था करोना काळात केवळ २ टक्यांनी वाढतांना दिसली. करोनाच्या संकटातुन बाहेर पडल्यानंतर भारतातील वस्तु व सेवांची मागणी वाढणार आहे. मागणीनुसार पुरवठा वाढविण्याची तसेच भारतीयांची भारतीय उत्पादनाकरीता मागणी वाढविण्याची ही एक मोठी संधी आहे. आणि या संधीचे जर सोने करावयाचे असेल तर सुक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रमांना (एमएसएमई) संजीवनी देण्याची गरज आहे. कारण या क्षेत्राच्या माध्यमातुनच आपण आत्मनिर्भर बनु शकतो, असा आशावाद २०१४ साली सत्तेवर आलेल्या नव्या सरकारचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी व्यक्त केला. आत्मनिर्भर भारत हा १३० कोटी देशवासीयांसाठी एमएसएमई च्या माध्यमातुन आर्थिक विकासाचा मंत्र बनविण्याची महत्वकांक्षा डोळयासमोर ठेवून याच्या अंमलबजावणीकरीता २० लाख कोटी रूपयाच्या पॅकेजचीही घोषणा केली. हे पॅकेज देशाच्या एकूण जी.डी.पी. च्या १० टक्के इतके होते. या पॅकेज मधुन ज्या क्षेत्रावर देशाचा १२ करोड रोजगार अवलंबून आहे. अशा सुक्ष्म, लघु आणि मध्यमउद्योगांच्या विकासाकरीता तब्बल ३ लाख कोटी रूपयेजाहिर केले आहे. या वरून या एमएसएमई क्षेत्राचा विकास अर्थव्यवस्थेच्या प्रगतीच्या दृष्टिने किती महत्वपूर्ण आहे याची कल्पना येते. याचाच शोध घेणे हाच या संशोधन निबंधाचा उद्देश आहे.

बीज संज्ञा :प्रस्तावना, एमएसएमई ची पार्श्वभूमी,व्याख्या,भूमीका, एकूण संख्या, रोजगार, जीडीपी तील हिस्सा, महत्व, समस्या, निष्कर्ष

**संशोधनाचा उद्देश:**

१) एमएसएमई चे स्वरूप व देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्व याचा अभ्यास करणे

३) एमएसएमई चे सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने योगदान याचा शोध घेणे.

४) आत्मनिर्भर भारत संकल्पना साकारण्यात एमएसएमई भूमीका याचा अभ्यास करणे.

गृहिते/परीकल्पना

१) देशात सुक्ष्म उद्योगावर निर्भर असणाऱ्या उपक्रमींचे प्रमाण जास्त आहे.

२) देशातील एकूण रोजगारात एमएसएमई चा वाटा जास्त आहे.

३) जिवणउपयोगी वस्तु उत्पादनात एमएसएमई चा वाटा जास्त आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संधोधन लेखाकरीता माहिती संकलनासाठी दुय्यम माहिती संकलन साधनांचा अवलंब करण्यात आला असून, वर्णनात्मक आराखडयात त्याचे प्राप्त तत्थांच्या आधारे विश्लेषणात्मक पध्दतीने विवेचन करण्यात आले आहे.

**एमएसएमई ची पार्श्वभूमी**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर सुध्दा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा कृषी हाच आहे. आणि लघु व कुटिर उद्योग हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुळ आधार आहे. ही बाब लक्षात घेऊन या क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देत अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या उद्देशाने तत्कालीन भारत सरकारने १६ जुन २००६ रोजी सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (एमएसएमईडी) कायदा २००६ संमत केला. जो २ आक्टोबर २००६ पासून लागु करण्यात आला. हा कायदा लागु झाल्यानंतर सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगात आता वस्तुच्या उत्पादनाबरोबरच सेवा क्षेत्राचा देखील समावेश करण्यात आला.

दिनांक ९ मे २००७ ला पुर्वीचे लघु उद्योग मंत्रालय व कृषी आणि ग्रामीण उद्योग मंत्रालय या दोन मंत्रालयाला एकत्र करून स्वतंत्र अशा सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली. या मंत्रालयाव्दारे सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या विकासाकरीता व सहायतेकरीता वेगवेगळया योजना प्रकल्प तसेच सुविधा व सुरक्षा प्रदान करून या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करते.

**सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाची(एमएसएमई) व्याख्या :**

१६ जुन २००६ रोजी सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (एमएसएमईडी) कायदा २००६ संमत केला. त्यानंतर तब्बल १४ वर्षांनी , १३ मे २०२० रोजी , आत्मनिर्भर भारत पॅकेजमध्ये एमएसएमई च्या गुतवणूकीच्या मर्यादेत वाढ करून दिनांक १ जुन २०२० च्या भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालयाच्या अधिसुचनेनुसारसूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाची (एमएसएमई) नविन व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात आली . ही अधिसुचना १ जुलै २०२० पासून लागु करण्यात आली आहे.

१) सुक्ष्म उद्योग हा असा उपक्रम आहे जीथे संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही १ कोटि पेक्षा जास्त नसावी. व उत्पादनाची विक्रि किंवा उलाढाल ५ कोटी पेक्षा जास्त नाही अशा उद्योगांना सुक्ष्म उद्योग म्हणावे.

२) लघु उद्योग हा असा उपक्रम आहे जीथे संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही १० कोटि पेक्षा जास्त नसावी. व उत्पादनाची विक्रि किंवा उलाढाल ५० कोटी पेक्षा जास्त नाही अशा उद्योगांना लघू उद्योग म्हणावे.

३) मध्यम उद्योग(एंटरप्राइझ) हा असा उपक्रम आहे जीथे संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही ५० कोटि पेक्षा जास्त नसावी. व उत्पादनाची विक्रि किंवा उलाढाल २५० कोटी पेक्षा जास्त नाही अशा उद्योगांना मध्यम उद्योग म्हणावे.

या आधीच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (एमएसएमईडी) २००६, कायदयाच्या प्रावधानानुसार, १) सुक्ष्म उद्योगात संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही २५ लाखपेक्षा जास्त नसावी. २) लघु उद्योगात संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही २५ लाखपेक्षा अधिक परंतु ५ कोटीपेक्षा जास्त नसावी. ३) मध्यम उद्योगात संयंत्र आणि यंत्रसामग्री किंवा उपकरणामध्ये केलेली गुंतवणूक ही ५ कोटी च्या अधिक परंतु १० कोटी पेक्षा जास्त नसावी. अशाप्रकारचे प्रावधान होते. आता त्यात प्रचंड प्रमाणात वाढ करण्यात आली आहे.

**भारताच्या अर्थव्यवस्थेत एमएसएमई ची भूमीका**

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्र हे गेल्या पाच दशकापासून देशाच्या अर्थव्यवस्थेला संतुलीत व गतिमान

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 257-262
A Double-Blind Peer Reviewed Journal

e-ISSN 2347 – 517X
Original Article

बनविण्याकरीता यशस्वीपणे कार्य करीत आहे. एमएसएमई मोठया उद्योगांच्या तुलनेत कमी भांडवली खर्चात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधीसोबतच ग्रामीण आणि मागासलेल्या भागांत औद्योगिकिकरणाला देखील चालना देण्याचे कार्य सातत्याने करत आहे. तसेच प्रादेशीक असमतोल दूर करून दरडोई व राष्ट्रिय उत्पन्न वाढविण्यास व रोजगाराच्या विकासासह देशाच्या निर्यात क्षमतेला प्रोत्साहन देत देशाच्या एकूण आर्थिक विकासाला गतिमान करण्यात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग महत्वाची भूमिका बजावत आहे.

८ नोव्हेंबर २०१६ नोटबंदिचा निर्णय, कर सुधारणा धोरणाचा एक राष्ट्र एक कर जीएसटी चा घेण्यात आलेला निर्णय, आणि लगेच आलेल कोविड–१९ महामारीच संकट त्यामुळे देशातील संपूर्ण सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम बंद पडले. त्याचा फार मोठा परीणाम देशाच्या उत्पन्न, उत्पादन, रोजगार व निर्यातीवर झाला. २७० अब्ज डॉलरची भारतीय अर्थव्यवस्था करोना काळात केवळ २ टक्यांनी वाढतांना दिसली. आणि या काळातच देशाच्या अर्थव्यवस्थेतील सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे महत्व किती आहे हे समजले. देशाच्या अर्थव्यवस्थेला पुर्व पदावर आणायचे असेल तर सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या विकासाशिवाय दुसरा पर्याय नाही हे क्षेत्र भारतीय अर्थव्यस्थेचा आत्मा असल्याचे अधोरेखीत झाले. हे खालील आकडेवारीवरून निदर्शनात येते.

**विविध उपक्रमात कार्यरत एमएसएमई ची संख्या**

| कार्य क्षेत्र | कार्यरत उपक्रमाची अंदाजीत संख्या(लाखात) | | | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | क्षेत्रनिहाय टक्केवारी |
| उत्पादन | ११४.१४ | ८२.५० | १९६.६५ | ३१ |
| बिजली | ०.०३ | ०.०१ | ०.०३ | ०० |
| व्यापार | १०८.७१ | १२१.६४ | २३०.३५ | ३६ |
| अन्य सेवा | १०२.०० | १०४.८५ | २०६.८५ | ३३ |
| **एकूण** | **३२४.८८** | **३०९.००** | **६३३.८८** | **१००** |

वरील तालीकेत राष्ट्रिय नमुना सर्व्हेक्षण २०१५–१६ (एनएसएस) च्या ७३ व्या फेरीनुसार पंजीकृत एमएसएमई व्यतिरीक्त देशात ६३३.८८ लाख म्हणजेच ढोबळमानाने ६.३ कोटी उद्योगएमएसएमई विविध आर्थिक व्यवसायात कार्यरत असल्याचे दिसून येत आहे.

**श्रेणीनुसार उपक्रमांची (उद्यमांची) संख्या (संख्या लाखात)**

| क्षेत्र | सुक्ष्म | लघु | लघु | एकूण उद्यम |
|---|---|---|---|---|
| **ग्रामीण** | ३२४.०९ | ०.७८ | ०.०१ | ३२४.८८ |
| **शहरी** | ३०६.४३ | २.५३ | ०.०४ | ३०९.०० |
| **एकूण** | **६३०.५२** | **३.३१** | **०.०५** | **६३३.८८** |

एमएसएमई ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात कार्यरत पुरूष व महिलांची टक्केवारी

| क्षेत्र | पुरूष | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| ग्रामीण | ७७.७६ | २२.२४ | १०० |
| शहरी | ८१.५८ | १८.४२ | १०० |
| **एकूण** | **७९.६३** | **२०.३७** | **१००** |

देशात एकूण६३३.८८ लाख ढोबळमानाने ६.३ कोटी एमएसएमई उद्योगापैकी सर्वाधिक ६३०.५२ लाख (९९.४ टक्के) सुक्ष्म उद्योग होते.एकूण एमएसएमई मध्ये ७९.६३ टक्के पुरूष व २०.३७ टक्के महिला उपक्रमी कार्यरत होते. या व्यवसायात मलिपेक्षा पुरूषांचे प्रमाण जास्त दिसून येते.

**एमएसएमई विविध उपक्रमात कार्यरत अंदाजीत रोजगार**

| कार्य क्षेत्र | कार्यरत रोजगार(लाखात) | | | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | क्षेत्रनिहाय टक्केवारी |
| उत्पादन | १८६.५६ | १७३.८६ | ३६०.४१ | ३२ |
| बिजली | ०.०६ | ०.०२ | ०.०७ | ० |
| व्यापार | १६०.६४ | २२६.५४ | ३८७.१८ | ३५ |
| अन्य सेवा | १५०.५३ | २११.६९ | ३६२.२२ | ३३ |
| एकूण | ४९७.७८ | ६१२.१० | ११०९.८९ | १०० |

**ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात कार्यरत लिंग निहाय रोजगाराचे प्रमाण(लाखात)**

| क्षेत्र | महिला | पुरूष | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण | १३७.५० | ३६०.१५ | ४९७.७८ | ४५ |
| शहरी | १२७.४२ | ४८४.५४ | ६१२.१० | ५५ |
| एकूण | २६४.९२ | ८४४.६८ | ११०९.८९ | १०० |
| टक्के | २४ | ७६ | १०० | |

राष्ट्रिय नमुना सर्व्हेक्षण २०१५–१६ (एनएसएस) च्या ७३ व्या फेरीनुसारदेशाच्या एकूण रोजगारात ४५ टक्के रोजगार म्हणजे जवळपास १२ कोटी रोजगार(ग्रामीण क्षेत्रात ४९७.७८ लाख व शहरी क्षेत्रात ६१२.१० लाख असे एकूण ११०९.८९ लाख रोजगार) सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगावर निर्भर असल्याचे दिसून येते.

**एकूण मुल्यवर्धित दर(जीव्हीए) व एकूण देशांतर्गत उत्पादन(जीडीपी) मधील एमएसएमई चा वाटा (आकडे कोटी रू.त आधार वर्ष २०११–१२ नुसार)**

| वर्ष | एमएसएमई जीव्हीए | वृध्दी (टक्के) | एकूण जीवीए | एमएसएमई चा जीवीए मधील हिस्सा | एकूण जीडीपी | एमएसएमई चा जीडीपी मधील हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| **२०१५–१६** | ४०५९९६६० | १०.९७ | १२५७४४९९ | ३२.२८ | १३७७१८७४ | २९.४८ |
| **२०१६–१७** | ४५०२१२९ | १०.९० | १३९६५२०० | ३२.२४ | १५३९१६६९ | २९.२५ |
| **२०१७–१८** | ५०८६४९३ | १२.९८ | १५५१३१२२ | ३२.७९ | १७०९८३०४ | २९.७५ |
| **२०१८–१९** | ५७४१७६५ | १२.८८ | १७१३९९६२ | ३३.५० | १८९७१२३७ | ३०.२७ |

स्त्रोत– केंद्रिय सांख्यिकिय कार्यालय (सीएसओ)सांख्यीकी और कार्यान्वयन मंत्रालय (वार्षिक रीपोर्टसूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय २०२०–२१ आधारे)

२०१८–१९ मध्ये देशाच्या नाममात्र सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी)वाटा ३० टक्के तर सकल मुल्य उत्पादनातील(जीवीए) वाटा ३३.५० टक्के आहे. तर, देशाच्या एकूण निर्यातीत ४८ टक्के वाटा सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वस्तु व सेवा उत्पादनांचा आहे. तसेच देशातील एकूण उद्योगापैकी ९० टक्के उद्योग(६.३ कोटी उद्योग) सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे असून या उद्योगांच्या उत्पादनात ६५०० प्रकारच्या विविध उत्पादनाचा समावेश आहे. वरील सर्व बाबीवरून वर्तमान काळात एमएसएमई चे अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिने किती महत्वाचे क्षेत्र व भूमिका आहे हे लक्षात येते.

**एमएसएमई चे देशाच्या आर्थिक विकासातील योगदान**

राष्ट्रिय नमुना सर्व्हेक्षण २०१५–१६ (एनएसएस) च्या ७३ व्या फेरीनुसार पंजीकृत एमएसएमई व्यतिरीक्त देशात ६३३.८८ लाख म्हणजेच ढोबळमानाने ६.३ कोटी उद्योग असंघटित बिगर कृषी एमएसएमई विविध आर्थिक व्यवसायात कार्यरत होते. देशाच्या एकूण रोजगारात ४५ टक्के रोजगार म्हणजे जवळपास १२ कोटी रोजगार(ग्रामीण क्षेत्रात ४९७.७८ लाख व शहरी क्षेत्रात ६१२.१० लाख असे एकूण ११०९.८९ लाख रोजगार) सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग देतो. सन २०१८–१९ मध्ये देशाच्या एकूण निर्यातीत ४८ टक्के वाटा सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वस्तु व सेवा उत्पादनांचा आहे. २०१८–१९ मध्ये देशाच्या नाममात्र सकल देशांतर्गत उत्पादनातील(जीडीपी) वाटा ३० टक्के तर सकल मुल्य उत्पादनातील(जीवीए) वाटा ३३.५० टक्के आहे. देशातील एकूण उद्योगापैकी ९० टक्के उद्योग(६.३ कोटी उद्योग) सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे असून या उद्योगांच्या उत्पादनात ६५०० प्रकारच्या विविध उत्पादनाचा समावेश आहे. व भविष्यात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचा

सकल देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५० टक्के पर्यंत घेउन जाण्याचे व देशाला आत्मनिर्भर बनविण्याची क्षमता व शक्ती एमएसएमई मध्ये असल्याचे वरील आकडेवारीवरून सहज निर्देशीत होते. सद्याचे सरकार एमएसएमई ची ही शक्ती ओळखुन देशाच्या अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे महत्वकांक्षी उद्दिष्ट ठेवते. यावरून एमएसएमई चे अर्थव्यवस्थेतील योगदान किती महत्वपूर्ण आहे याची प्रचीती येते.

**एमएसएमई चे भारताच्या अर्थव्यवस्थेतील महत्व:**

१) मोठया प्रमाणात रोजगाराची निर्मिती

२) आंतरराष्टिय व्यापारातील महत्व

३) जीडीपीतील मोठे योगदान

४) सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहन देते

५) उत्पादन प्रक्रियेतील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उत्पादन खर्च कमी.

६) सहज व सोपी व्यवस्थापन संरचना

७) आत्मनिर्भर भारत मेक इन इंडिया व स्टार्ट अप मध्ये महत्वाची भूमीका

**एमएसएमई पूढिल समस्या**

१)अपर्याप्त सुविधा

२)कच्च्या मालाची कमतरता

३) विपणनातील अडचणी

४) भांडवलाची अपर्याप्तता त्यामुळे गुणवत्ता व दर्जा टिकवून ठेवण्यात असमर्थ

५)बहुराष्टिय कंपण्यासमोर तग धरू शकत नाही.

६) उत्पादन खर्चाला मर्यादा त्यामुळे स्पर्धा करणे कठीण होते

७) जागतिक स्पर्धेत टिकाव शरू शकत नाही

८)व्यवस्थपन संरचनेत आधुनिकता आणने अशक्य होते

**संदर्भ :**

वार्षिक रीपोर्ट सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय २०२०–२१,२०२१–२२

वार्षिक रीपोर्ट सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय २०१७–१८

भाषण – शक्तिकांत दास सूक्ष्म, लघु और मध्यम उद्यम : चुनौतियां और भावी दिशा

सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय अधिसूचना नई दिल्ली, १ जून २०२०

सुक्ष्म, लघु और मध्यम उद्यम विकास अधिनियम २००६, (२००६ अधिनियम संख्यांक २७) (http://dcmsme.gov.in)